महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ
भविष्य निर्वाह निधी विभाग
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत तळ मजला
धारावी रोड, माटुंगा, मुंबई ४०० ०१९

फोन नं २४०९२५३१/२४०३१४९८ फॅक्स नं.२४०९३११०.

क्र.लेवि/भनिनि/अनुसुची/ ०/10 दिनांक 8 JAN 2025

## विभागीय परिपत्रक - क्रं. २४२

**विषय :-** RSM अनुसुची (Schedule) महिन्याच्या ७ तारखेपर्यंत ( CPF Portal) भनिनि प्रणालीमध्ये अद्ययावत करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे विभागीय परिपत्रक क्रं.२२४ दि.०७/०७/२०२२.

वरील संदर्भिय परिपत्रकास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, प्रत्येक महिन्याची (RSM Schedule) अनुसुची वेळेवर अद्ययावत करीत नसल्याचे भ.नि.नि कार्यालयास वारंवार निर्दशनास आलेले आहे. त्यामुळे म.रा.वि. मंडळ अंतर्गत असलेल्या चारही कंपनीतील कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांना वेळेवर भ.नि.नि निधीमधुन अगाऊ रक्कम तसेच अंतिम देयक रक्कम मंजुर करण्यास विलंब होते असतो.

परिपत्रक क्रं.२२४ दि.०७/०७/२०२२ नुसार आपणांस सुचना देण्यात आले होते की, आपल्या मंडळाअंतर्गत चारही कंपन्यानी त्यांचे अनुसुची (RSM Schedule), भ.नि.नि प्रणालीमध्ये (CPF PORTAL) महिन्याच्या ७ तारखेपर्यंत विना विलंब अद्ययावत करण्यात यावे. परंतु आतजतागायत या परीपत्रकाप्रमाणे कोणत्याही विभागीय कार्यालयांमधुन त्यावर कार्यवाही करताना आढळुन येत नाही, म्हणुन त्यात विलंब होताना दिसत असल्याने नवीन परीपत्रकानुसार सदर विभागीय कार्यालयावर किंवा सदर अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

सबब सदरची अनुसुची ( Schedule) ७ तारखेपर्यंत भनिनि कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर भनिनि विभागाकडुन प्रमाणीकरण (Validation) करण्यात येते, परंतु सदरचे Validation करते वेळी उद्‌भवलेल्या अडचणींची कृपया नोंद घ्यावी व त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन अनुसुची ( Schedule) अद्ययावत करण्यात यावी प्रमाणीकरण (Validation ) करते वेळी निर्दशनास आलेल्या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

१) अद्ययावत झालेल्या अनुसुची या सांघिक कार्यालयाने प्रेरित केलेल्या परिपत्रकानुसार नसतात.

२) बदलीवर नियुक्त झालेल्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांच्या नोंदी या विभागीय मासं कार्यालयाकडुन उशिराने प्राप्त होतात. त्यामुळे अनुसुची प्रमाणीकरण (Schedule Validation) करण्यास विलंब होतो.

३) कर्मचारी / अधिकाऱ्यांचे उचल रक्कमेचे व्याज, विश्वस्त मंडळ (BOT) ची रक्कम ही त्यांनी घेतलेल्या कर्जाच्या माहितीनुसार व्यवस्थित कपात झालेली नसते. कर्मचाऱ्याच्या उचल रक्कमेच्या कर्जाच्या व्याजाची रक्कम व विश्वस्त मंडळाच्या १% (BOT) ची रक्कम भरते वेळी, कर्जाची मागील माहिती CPF - Protal वर उपलब्ध असताना देखील विभागीय कार्यालय मा.सं. विभागाकडुन संपुर्ण रक्कम म्हणजेच विश्वस्त मंडळ १%(BOT) ची रक्कम

देखील व्याजाच्या रक्कमेत भराणा केलेली असते सदर (BOT) ची रक्कम कपात ही (BOT) तक्त्यामध्येच भरून अद्ययावत करावी.

४) उचल रक्कमेची मुद्दल थकबाकी असताना देखील कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या पगारातून व्याजाची रक्कम कपात केली जाते.

५) नियमित S - Form विभागीय लेखा खात्याकडुन वेळेत अद्ययावत न केल्याने त्याचा परिणाम विभागीय कार्यालयाच्या मासं विभागाने दिलेल्या अनुसुची (Schedule) व लेखा विभागाच्या अनुसुचीमध्ये तफावत आढळुन येते.

६) कर्मचारी/अधिकारी यांची भनिनि रक्कम(PF) ही त्याच्या मुळ वेतन आणि महागाई भत्याच्या १२% प्रमाणे कपात करावयाची असते परंतु मुळ वेतन व महागाई भत्त्याची रक्कम १२ % प्रमाणे कपात केलेली नसते. त्यामुळे विभागीय लेखा विभागाकडुन कपात केलेली रक्कम भ.नि.नि कार्यालय अनुसुची (Schedule) मधील रकमेत तफावत आढळुन येते.

७) उचल रक्कमेच्या व्याजाची रक्कम कर्मचाऱ्याकडुन एक रकमी भरुन घेतलेली असताना देखील पुढील माहिन्यात व्याज व विश्वस्त मंडळ रक्कम १% (BOT) पुनश्च कपात केली जाते.

८) कर्मचाऱ्याची जन्म तारीख ही भ.नि.नि कार्यालयात असलेल्या अभिलेखा (Master data) व SAP प्रणालीनुसार प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे दिसत नसुन त्यामध्ये बरीच तफावत असते.

९) कर्मचारी हप्ता क्रमांक (Instalment No.) व उचललेल्या रक्कमेचा मंजुरी क्रमांकामध्ये (Sanction No.) तफावत असते व चुकीच्या पध्दतीने भरणा केल्यामुळे दोन्ही खात्यामध्ये फरक आढळुन येतो.

भ.नि.नि विभागीय प्रणाली (CPF Portal) मध्ये ECR EPS file दिलेल्या वेळेत भरणा होत नसल्याने अनुसूची अंतिमीकरण करण्यात दिरंगाई होत आहे. तथापी दर महिना दि.१ ते १४ पर्यंत भ.नि.नि. विभागीय प्रणाली (CPF Portal) मध्ये ECR EPS file ची भरणा करण्यात यावी..

वरील सर्व बाबीं लक्षात घेता त्यात योग्य त्या सुधारणा करुन हया कार्यालयास महिन्याच्या ७ तारखेपर्यंत विनाविलंब अनूसुची (Schedule) अद्ययावत करुन सहकार्य करावे.

**अध्यक्ष**
**म.रा.वि.मं.भ.नि.नि.विश्वस्त न्यास**
**संचालक मंडळ**

**प्रत :**

D:\DATA BACKUP VIJAY\SHELKE SIR 22 NOV 2021